मुंबई, मंगळवार, १० मार्च २०१५ | वर्ष : २७ अंक : ४५ | पृष्ठे १२ | मूल्य : ४.०० रुपये | ★★ शहर आवृत्ती
ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक
सामना

# 'विद्युल्लता' पाहण्यासाठी ठाणेकरांची गर्दी

ठाणे, दि. ९ (प्रतिनिधी) – समाजातील कर्तृत्ववान महिलांची माहिती आपल्याला नेहमीच वाचायला मिळते. मात्र समाजाला कळत-नकळत वेगळी दिशा देणाऱ्या त्यांच्या कार्याची माहिती क्वचितच पाहायला मिळते. आपल्या कामातून समाजात आगळेवेगळे स्थान निर्माण करणाऱ्या अशा महिलांची कर्तबगारी पाहण्याची संधी 'विद्युल्लता' या छायाचित्र प्रदर्शनामुळे ठाणेकरांना मिळाली असून प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी प्रेक्षकांनी गर्दी केली.



फोटो सर्कल सोसायटी या ठाण्यातील छायाचित्रकारांच्या प्रसिद्ध संस्थेतर्फे व विवियाना मॉल यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून 'विद्युल्लता' हे प्रदर्शन ९ ते ११ मार्च या कालावधीत विवियाना मॉल येथे आयोजित करण्यात आले आहे. प्रदर्शनात पूर्वांचल येथील १४ महिला व महाराष्ट्रातील ४ महिलांचा समावेश आहे. यात पूर्वांचल येथील जेसिमा सुचियाड, एप्रिलदा बारे, तेरेसा खोङथॉ, फोर्सिला डखार, मीरा डखार, कोंग ड्रीम, बिरुबाला राभा, जोनाकी बारो, अरुणी हिगिओ, पद्मश्री डॉ. बिन्नी यांगा, आईनी तालोड, ओ इंदिरा ओइनाम, शीलारमणी, डॉ. जामिनी देवी यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील सुनीता पाटील, अहिल्या महिला मंडळ (पेण), रजनी परांजपे, प्रीती पाटील यांचा समावेश आहे.